# बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाने लोकांना पश्चात्ताप करण्यास सांगितले

### मुलांना शिकवणाऱ्यांनी R3b हा अभ्यास वाचावा.

**प्रार्थना.** ''हे आमच्या स्वर्गीय प्रेमळ पित्या, आम्ही बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाप्रमाणे पातक्यांना पश्चाताप करुन ख्रिस्ताकडे वळवावे यासाठी आमचे साहाय्य कर. तसेच, पापाकडे पुन्हा वळलेल्या विश्वासणाऱ्यांना हळूवारपणे पूर्वपदावर आणण्यासाठीही मदत कर.''

## 1. देवाच्या वचनातून तुमच्या अंत:करणाची तयारी करा

पाहा लूक 3:1-18 मध्ये बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाने हजारो पातक्यांना पश्चाताप करण्यास कसे प्रवृत्त केले.

- लोक, ते चांगले आहेत अशा उद्देशाने बाप्तिस्मा घेण्यास आले तेव्हा योहानाने त्यांना काय सांगितले?
- पापी लोक त्यांच्या पापांची कबूली देत आले तेंव्हा योहानाने त्यांच्यासाठी काय केले?



पाहा लूक 15:1-10 मध्ये हरवलेल्या मेंढराच्या दृष्टांतात, देवदूतांना स्वर्गात का आंनद झाला.

काही पाळक मेंढपाळांनी पापी लोकांनी पश्चात्ताप करावा यासाठी त्यांना रागावून, धाकदपटशा दाखवून त्यांच्यावर दबाव आणला.

आम्ही हे अधिक चांगल्या प्रकारे करावे यासाठी येशूने हा कथावृत्तांत स्पष्ट केला.



- तुम्ही बहकून गेलेले 'मेंढरु' आहात अशी कल्पना करा पण उत्तम मेंढपाळाने तुम्हांला शोधाले.
- तो तुम्हांला हळूवारपणे उचलून जवळ घेतो आणि पुन्हा कळपात, त्याच्या लोकांकडे घेऊन येतो.
- तो रागावेल, शिक्षा करेल अशी भीती तुम्हांला वाटते पण त्याच्या चेहऱ्याकडे पाहिले तर फक्त प्रेम-जिव्हाळा आणि आनंदच पहायला मिळतो.
- आता नाहीतर नंतर आपण सर्वच जण कधी ना कधी वाट चुकतो-बहकतो पण असे वाट चुकलेले मेंढरु येशूच्या दृष्टीने मोठे मोलवान असते.
- चुकलेल्या चुकार मेंढराचा शोध लागेपर्यन्त मेंढपाळ बाकीची मेंढरे बाजूला ठेवतो आणि त्या मेंढराला परत कळपात घेऊन येतो.

- आम्ही वाट चुकून बाजूला गेलो तरी येशू आमच्यावर प्रेम करतो. त्याने आमच्यावर एवढे प्रेम केले की तो आमच्यासाठी मरण पावला. रोम 5:8
- पापी लोकांना पश्चात्ताप करण्यास पाचारण करणे आणि बहकलेल्या विश्वासणाऱ्यांना परत पूर्वपदावर आणणे यातील अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे त्यांच्या विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करायची नाही तर त्याला प्रेमाने परत आणणे अगत्याचे आहे.
- तुम्ही एखाद्या मुलाला रागाने शिस्त लावली तर तेही रागारागानेच प्रतिसाद देईल. तुम्ही त्याला प्रेमाने जवळ घेऊन शिस्त लावली तर ते काही शिकेल.
- मंडळीतील एखादा सदस्य वाट चुकतो तेव्हा त्याला शिस्त लावण्यामागे त्याला शिक्षा करण्याचा नाही तर त्याला परत पूर्वपदी आणणे हा तुमचा उद्देश असतो.
- प्रेषित पौल आपल्याला गलती 6:1 मध्ये सांगतो, ''बंधुजनहो, कोणी माणूस एखाद्या दोषात सापडला तरी जे तुम्ही आध्यात्मिक वृत्तीचे आहा ते तुम्ही अशाला सौम्य वृत्तीने ताळयावर आणा, तूही परीक्षेत पडू नये म्हणून स्वत:कडे लक्ष दे.''
- केव्हा केव्हा एखाद्याला पूर्वपदी आणण्यासाठी आपल्याला प्रसंगी कठोर कृती करावी लागते, पण हे सर्व आपण शक्यतो नेहमीच प्रेमाने आपुलकीने केले पाहिजे.

## 2. येत्या आठवडयातील कार्यक्रमांविषयी सहकाऱ्यांशी चर्चा करुन योजना आखा.

ख्रिस्ताची गरज असणाऱ्या मित्रांची भेट घ्या आणि देव त्यांच्यावर प्रीती करतो, त्यांच्या पातकांची क्षमा करतो आणि त्यांना खऱ्या पवित्र व आनंदी सार्वकालीक जीवन देण्याची इच्छा आहे हे स्पष्ट करुन सांगा.

वाट चुकलेल्या कोणत्याही विश्वासणाऱ्यांना भेटा. गलती 6:1 मध्ये सांगितल्याप्रमाणे त्यांना पूर्वपदी आणा.

- त्यांचा पालट झाला आहे याची त्यांना प्रेमाने आठवण करुन द्या.
- त्यांच्या पापीपणाची खात्री देव करुन देतो का याचा शोधा घेण्याचा प्रयत्न करा.
- त्यांना देवाची महान प्रीति समजली आहे का हे जाणून घ्या.
- देवाने त्यांची जीवने बदलून टाकावीत याकरीता त्यांच्याबरोबर प्रार्थना करा.

## 3. आगामी उपासना सभेविषयी तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करुन योजना आखा.

सध्याच्या गरजा आणि स्थानिक रितीरिवाज यानुसार योग्य कार्यक्रम निवडा.

लूक 3:1-18 मधून बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाचा कथावृत्तांत सांगा किंवा नाट्यीकरण करा. भाग 1 मधील माहितीवर प्रश्न विचारा.

- पश्चात्ताप करणे अगत्याचे आहे, म्हणजे, अंत:करण बदलणे आणि देवावर भंरवसा ठेवणे (योहान 3:1-8).
- देव आम्हा विश्वासणाऱ्यांना पापांची क्षमा करतो आणि त्याची मुले म्हणून आमच्यावर कायमस्वरूपी शिक्का मारतो तसेच पवित्र आत्मा आमचा आध्यात्मिक पुर्नजन्म करतो (इफिस 1:13-14).

**प्रभुभोजनाची** ओळख करुन देण्यासाठी लूक 3:4-7 मधून लोक बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाकडे येऊन आपली पापे कबूल करीत त्याविषयी सांगा.

प्रभुभोजन घेण्यापूर्वी आपण असेच करतो हे स्पष्ट करुन सांगा. प्रभुभोजन घेण्यापूर्वी आपण स्वत:चे आत्मपरीक्षण करतो आणि आपली पातके देवाजवळ कबूल करतो, 1 करिंथ 11:28

मुलांना जक्कय विषयीची नाटिका सादर करण्यास सांगा. त्यांना नाटिकेवरील प्रश्न तयार करुन मोठया माणसांना विचारता येईल.

आपल्या नव्या जन्मामधील मानवाचा सहभाग आणि देवाचा सहभाग स्पष्ट करा.

- आमचा सहभाग, पश्चात्ताप करा (आमच्या **पापांची क्षमा** होणे आणि आमची अंत:करणे बदलून टाकणे यासाठी देवावर भरंवसा ठेवा) रोम 12:2
- देवाचा सहभाग, आमच्या ठायी नवे जीवन घालून आमच्यावर त्याची मुले म्हणून कायमचा शिक्का मारतो, 1 पेत्र 1:3, इफिस 1:11-14.
- प्रथम, वाचा याकोब 2:14-23 विचारा.
- याकोब कोणत्या दोन प्रकारच्या विश्वासाचा उल्लेख करतो?
- विचारा : दोन प्रकारच्या विश्वासामध्ये काय फरक आहे? (विश्वासाचा परिणाम म्हणून जीवन बदलून गेले पाहिजे आणि सत्कृत्ये घडावीत अशी देवाची इच्छा आहे. पश्चाताप करण्यातून सुरु न होणाऱ्या विश्वासापासून सावध राहा. याकोब सांगतो, भुतेही विश्वास ठेवतात आणि थरथर कापतात) कविता वाचा, सैतान **नवीन पाळकांच्या कानात कुजबुजतो**

खोटारडा नेम धरतो, बाण सुटतो! बाणाच्या टोकाला खोटेपणाचे विष लावलेले असते!
हया जळत्या बाणांचा संदेश? ''त्यांच्या अंत:करणांत ख्रिस्त आहे का हे विचारु नका!
''फक्त कृपेचे वचन द्या, देवाचे नियम विसरा, गर्दी जमवायला काय वाट्टेल ते सांगा!
त्यांनी पश्चाताप करावा आणि स्वर्गातून आलेल्याची ओळख करुन घ्या असे मुळीच सांगू नका.
''कोणाला दुखवू नका किंवा रडवू नका, कानांना ऐकायला बरे वाटेल असेच काही तरी बोला,
आणि रिता निष्फळ विश्वास देऊ करा-असा विश्वास मी देखील आपलासा करीन!''

देवाने पश्चात्ताप करण्यास कशा प्रकारे साहाय्य केले याविषयी साक्ष देण्यास लोकांना सांगा.

येथे एक तरुण स्त्रीचे उदाहरण दिले आहे. ''अनेक वर्षे मी गुरुच्या मागे घालवली, संस्कृतमध्ये मंत्र म्हटले आणि आश्रमात राहिले. माझे स्वत:चे जग उभारता उभारता मी जवळ-जवळ संपलेच होते. एके दिवशी मला समजले की मी एक कोणतीहि आशा नसलेली स्वत:चे तारण करण्यास असमर्थ अशी पातकी आहे आणि येशूची मझ्यावर प्रीति आहे तसेच माझे तारण करण्याचे सामर्थ्य त्याच्या ठायी आहे. मग मी निष्क्रीय असमर्थ देव दैवत सोडून दिली माझ्या अविश्वासाच्या पापा बदल क्षमा मागितली आणि माझे जीवन येशूला दिले."

**पाठ करा मार्क 1:5**

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net